# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## क क्षेत्रीय कार्यालय
## कार्यपत्रिका क्रमांक-७
## सभावृत्तांत

दि.- ०२/९/२०१५ वेळ –दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्याक प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि. ०२/९/२०१५ रोजी दुपारी ३:०० वाजता क क्षेत्रीय कार्यालयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) **मा. मोटे किरण बाळासाहेब** **सभापती**
२) मा.सावळे सिमा रविंद्र
३) मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
४) मा.भोसले राहूल हनुमंतराव
५) मा.पालांडे सुजाता सुनिल
६) मा.सौ.पानसरे अमिना महंमद
७) मा.गिता सुशिल मंचरकर
८) मा.गायकवाड संध्या सुरदास
९) मा.शेंडगे आशा सुखदेव
१०) मा.संजय केशवराव काटे

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा. फुंदे डि.एम.-क्षेत्रीय अधिकारी, मा.रामकिसन लटपटे- प्रशासन अधिकारी, मा.दांगट-कार्यकारी अभियंता (स्थापत्य), मा.संजय खाबडे-कार्यकारी अभियंता विदयुत, मा.दिलीप धुमाळ - उपअभियंता,विदयुत, मा.शिंदे- उपअभियंता स्थापत्य, मा.वायकर- उपअभियंता स्थापत्य,मा.पुजारी-उपअभियंता (झोनिपू), श्री.क्षिरसागर-कनिष्ठ अभियंता स्थापत्य,मा.रविंद्र भोकरे-सहा.आरोग्याधिकारी,मा.उगले-लेखाधिकारी, हे अधिकारी उपस्थित होते.

**मा.सभापती**- उपस्थित सन्मा.सदस्य अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक-१) नेहरुनगर गावठाण (दाटवस्ती) मधील १० फुट रस्ता रद्द करणेबाबत- मा.राहूल भोसले, मा.गिता मंचरकर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-२) स्मारक उभारणेबाबत - मा.अमिना पानसरे, मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-३) स्व्च्छतागृहाची दुरुस्ती करुन मिळणेबाबत- मा.संध्या गायकवाड मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-४) डांबरीकरण करुन मिळणेबाबत- मा.संध्या गायकवाड मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-५) कै.महादेवराव सोनबा हुलावळे सभागृह नांव देण्याबाबत- मा.संध्या गायकवाड मा.गिता मंचरकर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-६) कै. भगवंतराव गाडवेसर नांव देण्याबाबत- मा.संध्या गायकवाड मा.गिता मंचरकर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ७) ज्येष्ठ नागरिकांकरिता विरंगुळा केंद्र बदलून मिळणेबाबत- मा.संध्या गायकवाड मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-८) पाणीपुरवठा बैठक नियोजनास सर्व सदस्यांना बोलविणेबाबत- मा.सिमा सावळे, मा.आशा शेंडगे यांचा प्रस्ताव.

अ) दि. ०१/७/२०१५ व दि.०५/८/२०१५ रोजी (सकाळी १०:४५ वाजता) झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ४ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दि.०५/८/२०१५ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ५ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

क) दि.२१/८/२०१५ रोजी झालेल्या विशेष सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ६ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-------

ठराव क्रमांक- १३० विषय क्रमांक- १

दिनांक- २/९/२०१५ विभाग-

सुचक- मा.राहूल भोसले अनुमोदक- मा.गिता मंचरकर

संदर्भ- मा.राहूल भोसले,मा.गिता मंचरकर यांचा प्रस्ताव.

मौजे पिंपरीवाघेरे मधील नेहरुनगर गावठाण (दाटवस्ती) भागांमध्ये महानगरपालिकेमार्फत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये ठिकठिकाणी १० फुट रुंदीचे रस्ते प्रस्तावित करण्यात आलेले आहेत.

तथापि सुधारित मंजुर विकास योजनेतील ७.०० मी.रुंद रस्त्यांपासून सि.स.नं.५०३९ पै,५०३३,५०२७,५०२५,५०२५/१,५०२६ मिळकतीमधील १० फुट रुंदीचा रस्ता वापरात नसल्याने त्या रस्त्याची आवश्यकता नाही तरी सदर मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये प्रस्तावित केलेला सदरचा सि.स.नं.५०३९ पै,५०३३,५०२७,५०२५,५०२५/१,५०२६ मिळकतीमधील १० फुट रुंदीचा रस्ता रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे.मा.महापालिका सभेकडील मान्यतेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न् पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्रमांक- १३१ विषय क्रमांक- २

दिनांक- २/९/२०१५ विभाग-

सुचक- मा.अमिना पानसरे अनुमोदक-मा.राहूल भोसले

संदर्भ- मा.अमिना पानसरे, मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

एच.ए.कंपनीच्या डाल्को येथील जागा कत्तलखान्यासाठी प्रस्तावित केलेली आहे. तरी कत्त्लखाना होण्यासाठी काही तांत्रिक अडचण होत असतील तर त्या जागेवर शहरातील समाजाच्या मागणीवरुन त्याठिकाणी **"क्रांतीवीर मौलाना अब्दुल कलाम आझाद"** या नावाने पुण्याच्या धर्तीवर (पुणे मनपा) भव्य स्मारक उभारणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्रमांक- १३२ विषय क्रमांक- ३
दिनांक- २/९/२०१५ विभाग-
सुचक- मा.संध्या गायकवाड अनुमोदक-मा.सुजाता पालांडे
संदर्भ- मा.संध्या गायकवाड मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

वॉर्ड क्र.६२ स्वामी समर्थ मंदिरा समोरील ४० स्वच्छतागृह हे गेली ३० वर्षापुर्वीची असून खूप नादुरुस्त झालेले आहे अक्षरशा घुसी वगैरे लागलेमुळे स्वच्छतागृहामध्ये स्टाईल वगैरे फुटल्या असून दरवाजे सुध्दा तुटले आहे.तरी सदरच्या स्वच्छतागृहाची दुरुस्ती करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्रमांक- १३३ विषय क्रमांक- ४
दिनांक- २/९/२०१५ विभाग-
सुचक- मा.संध्या गायकवाड अनुमोदक-मा.सुजाता पालांडे
संदर्भ- मा.संध्या गायकवाड मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

वॉर्ड क्र.६२ सेवानगर,कुंदननगर मायानगरी, अग्रसेननगर येथे ब-याच दिवसापासून डांबरीकरण झालेले नाही संपुर्ण रस्ता खराब झाला आहे. ताबडतोब संपुर्ण रस्त्याचे डांबरीकरण करणेत यावे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्रमांक- १३४ विषय क्रमांक- ५
दिनांक- २/९/२०१५ विभाग-
सुचक- मा.संध्या गायकवाड अनुमोदक-मा.गिता मंचरकर
संदर्भ- मा.संध्या गायकवाड, मा.गिता मंचरकर यांचा प्रस्ताव.

वॉर्ड क्र.६२ फुगेवाडी मध्ये कै.भिकोबा देवकर सांस्कृत भवन येथे आतील हॉल मधील हॉलला **"कै.महादेवराव सोनबा हुलावळे सभागृह"** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्रमांक- १३५ विषय क्रमांक- ६
दिनांक- २/९/२०१५ विभाग-
सुचक- मा.संध्या गायकवाड अनुमोदक-मा.गिता मंचरकर
संदर्भ- मा.संध्या गायकवाड, मा.गिता मंचरकर यांचा प्रस्ताव.

वॉर्ड क्र.६२ कुंदननगर येथील नवीन ७ मीटर रस्त्याच्या अग्रसेन सोसायटीलगत चौकास **"कैलासवासी भगवंतराव गाडवेसर"** असे नामकरण करणेस व नामफलक लावणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्रमांक- १३६ विषय क्रमांक- ७
दिनांक- २/९/२०१५ विभाग-
सुचक- मा.संध्या गायकवाड अनुमोदक- मा.अमिना पानसरे
संदर्भ- मा.संध्या गायकवाड, मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव.

वॉर्ड क्र.६२ फुगेवाडी येथील ज्येष्ठ नागरिकांना पिंपरी चिंचवड महापालिका क प्रभागाकडून विरंगुळाकरिता जागा मिळाली असून ती जागा तिस-या मजल्यावर असल्याने ज्येष्ठ नागरिकांना विरंगुळा केंद्रावर जाण्यास खुप अडचण येते म्हणुन जुना दवाखाना सध्या मोकळा असल्यामुळे येथे ज्येष्ठ नागरिकांना विरंगुळा केंद्राकरिता जागा उपलब्ध करुन देणेत यावी.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्रमांक- १३७ विषय क्रमांक- ८
दिनांक- २/९/२०१५ विभाग-
सुचक- मा.सिमा सावळे अनुमोदक-मा.आशा शेंडगे
संदर्भ- मा.सिमा सावळे, मा.आशा शेंडगे यांचा प्रस्ताव.

सध्या पाण्याची परिस्थिती गंभीर होत आहे त्याचे नियोजन करणेसाठी होणा-या सर्व बैठकीस मनपाचे सर्व सदस्यांना बोलविण्यात यावे. व सदर ठराव मा.आयुक्त सो.यांचेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले. सही/-

(मोटे किरण बाळासाहेब )
सभापती क प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका



क क्षेत्रीय कार्यालय भोसरी २६
जा.क्र.कक्षेका/कावि/ १२१ /२०१५
दिनांक- ५/९/२०१५

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा) क प्रभाग समिती

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.